राज्यातील नागरी भागातील अनधिकृत बांधकामांवर / अतिक्रमणांवर सनियंत्रण ठेवण्यासाठी व आळा घालण्यासाठी सर्व नियोजन प्राधिकरणे / विशेष नियोजन प्राधिकरणे यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम १५४ अन्वये निदेश.

# महाराष्ट्र शासन

## नगर विकास विभाग

**शासन निर्णय क्र.टिपीएस-१८१५/प्र.क्र.३५९/१५/नवि-१३.**

**मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.**

**दिनांक :- ०६/०५/२०१६.**

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६.**

**प्रस्तावना :-**

अनधिकृत बांधकामे / अतिक्रमणे High Resolution Satellite Images/Aerial Photographs (Remote Sensing Technique) द्वारे शोधून काढण्यासाठी व त्यासंदर्भाने सदर अनधिकृत बांधकामाविरुध्द कार्यवाही करण्यासाठी वा सदर अनधिकृत बांधकामे होऊ नयेत या दृष्टीकोनातून प्रतिबंधात्मक उपाययोजना करणेबाबत संबंधित नियोजन प्राधिकरणांना निदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याअनुषंगाने शासन राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे / विशेष नियोजन प्राधिकरणे यांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ च्या कलम-१५४ अन्वये खालील प्रमाणे निदेश देत आहे.

## <u>निदेश</u>

१. राज्यातील सर्व नियोजन प्राधिकरणे / विशेष नियोजन प्राधिकरणे यांनी त्यांचे कार्यकक्षेतील क्षेत्रासाठीचे ०.५ मी. resolution असलेली उपग्रह छायाचित्रे (Satellite imaginary) मान्यताप्राप्त संस्थेकडून त्वरीत उपलब्ध करुन घ्यावीत व ही उपग्रह छायाचित्रे संबंधित क्षेत्रासाठीच्या पदनिर्देशित अधिकाऱ्यास (designated Officer) तात्काळ सुपूर्द करावीत.

२. संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्याने सदर उपग्रह छायाचित्राच्या आधारे सविस्तर बेसमॅप तयार करावा. व सदर बेसमॅप वर शहरातील मंजूर बांधकामे/ मंजूर अभिन्यास/ मंजूर बांधकाम प्रकल्पांचे आरेखन करावे. त्याव्यतिरिक्त निदर्शनास आलेली बांधकामे शोधून काढावी व अशा बांधकामांना परवानगी प्राप्त नसल्यास त्यांना अतिक्रमणे/ अनधिकृत बांधकामे समजण्यात यावे.

३. दर ६ महिन्यांनी अद्ययावत उपग्रह छायाचित्रे उपलब्ध करुन घेऊन दरम्यानच्या कालावधीत होत असलेल्या अतिक्रमणांवर / अनधिकृत बांधकामांवर प्रभावी पध्दतीने संनियंत्रण ठेवावे. तसेच यास्तव अशा अनधिकृत बांधकामांची नोंद करणे, संबंधितांना नोटीस देणे व तत्संबंधाने वेळोवेळी करावयाच्या कार्यवाहीसाठी आवश्यक ती संगणक प्रणाली नियोजन प्राधिकरणांनी सत्वर विकसित करावी व पूर्ततेबाबत शासनास अवगत करावे.

४. हे निदेश तत्काळ अंमलात येतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०५०७१५२५३६९८२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नांवाने व आदेशानुसार,

Avinash Bhalchandra Patil

Digitally signed by Avinash Bhalchandra Patil
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=URBAN DEVELOPMENT DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Avinash Bhalchandra Patil
Date: 2016.05.07 15:29:01 +05'30'

**(अविनाश पाटील)**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी**
सर्व नियोजन प्राधिकरणे/विशेष नियोजन प्राधिकरणे.

**प्रत माहितीसाठी,**

१) मा. मुख्यमंत्री महोदयांचे सचिव.
२) मा. राज्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव.
३) प्रधान सचिव (नवि-१) यांचे स्वीय सहायक.
४) प्रधान सचिव (नवि-२) यांचे स्वीय सहायक.
५) सह सचिव, तथा संचालक,(नगर रचना), नगर विकास विभाग
६) संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) सह सचिव,तथा सह संचालक,(नगर रचना), नगर विकास विभाग
८) सर्व अवर सचिव/ कक्ष अधिकारी, नगर विकास विभाग.